# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10 / 07 / 2023 (सोमवार) दुपार

---

## चोरी

१) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावरील हायवे इन हॉटेलचे मागे नागपुर जबलपुर हायवे येथे दिनांक ३०/६/२०२३ चे दिनांक ०१/०७/२०२३ चे १९/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– विशाल आनंद जांभुळकर, वय ४० वर्ष, रा. १ प्लाट नं. ४१ सन्यालनगर टेकानाका नागपुर याचा आयसर टॅंकर १४ चक्का क्र. एम.एच.– २२ ए. एन.– १९६४ हा १५ दिवसापासुन खराब झाल्याने कन्हान रिंग रोड हायवे इन हॉटेलचे मागे उभा केला असता दिनांक ३०/०६/२०२३ रोजी हॉटेल हायवे इनचे मालकाने फोन करून सांगीतले की तुमचा टॅंकर एम. एच.– २२ ए. एन.– १९६४ चे टायर चोरी झाले आहे. यावरून फिर्यादीने तेथे जावुन बघीतले असता सदर टॅंकरचे टायर दिसुन न आल्याने सदर टॅंकरचे सीइएटी कंपनीचे ६ टायर डिस्क किंमती अंदाजे ६००००/– रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार गणेश पाल मो. नं. ९५५२५१२६८ हे करीत आहे.

२) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील मौजा लाडगाव येथे दिनांक ०७/०७/२०२३ चे १२/०० वा. ते १५/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रमोद उमाजी राउत, वय ३२ वर्ष, रा. लाडगाव ता. काटोल जि. नागपुर याचे सेकंड हॅन्ड फोर व्हिलर गाडी घेणेकरीता महाराष्ट्र बॅंकेतील त्याच्या अकाउंट मधुन ३,००,०००/– रूपये कॅश काढले तेव्हा सोबत विलास मसराम हा सोबत होता. त्याने दुसऱ्याच्या मोबाईल वरून सेकंड हॅंड झायलो कारचा फोटो दाखवीला नंतर फिर्यादी व संशयित आरोपी नामे– विलास मसराम, वय ४५ वर्ष, रा. लाडगाव ता. काटोल हे दोघेही दारू पिण्याकरीता गेले तेव्हा फिर्यादीने ५०,०००/– रूपये एक बंडल खिशात ठेवला व बाकीची कॅश गाडीच्या डिक्कीत २,५०,०००/– रू. ठेवले त्यानंतर दुपारी ०३.०० वा. दोघेही लाडगावात आले व गाडीतील डिक्की पाहीले तर डिक्कीत ठेवलेले २,५०,०००/– रू. नव्हते फिर्यादीचे ओळखीचा व दारू पिल्याचा फायदा घेवुन आरोपीने नजर चुकवुन चोरी केल्याचा संशय आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक कोळी मो. नं. ९६५७८११११ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर